Reg. No.CIN-U01114PN2020PTC194889
SNEHBANDH AGRO FARMERS PRODUCER CO. LTD.
SNEHBANDH AGRO
Reg. Office- Chapadgaon Tal- Shevgaon, Dist- Ahmednagar. Pin-414503
Mob – 9370965520 Email – snehbandhagro@gmail.com

(प्रपत्र क्र. ३/१)

# दर पत्रक मागणी पत्र

जा.क्र. दिनांक: २५/०९/२०२३

प्रति,
............
.............

**विषय :- ...औजार खरेदी करीता दर पत्रक मागविण्याबाबत...**

महोदय,

जागतिक बँक अर्थसहाय्यीत स्मार्ट प्रकल्पाअंतर्गत स्नेहबंध अग्रो फार्मर्स प्रोड्युसर कं लि.समुदाय आधारीत संस्थेच्या कांदा खरेदी, साठवणूक व विक्री या उपप्रकल्पासाठी खालील प्रमाणे वस्तु खरेदी करणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्याकडून सिलबंद दरपत्रक मागविण्यात येत आहे.

**१.खालील वस्तुच्या पुरवठ्यासाठी तुमच्याकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.**

| अ.क्र. | वस्तुचे नाव | वस्तुचे मापदंडविवरण/ | एकक (युनिट) | संख्या/ नग | वस्तु पोहोच करण्यासाठी कालमर्यादा (दिवसात) | वस्तु पोहोच करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Trailer | Up to 5 Ton Capacity | 1 | 1 | 15 | स्नेहबंध अग्रो फार्मर्स प्रोड्युसर कं लि.चापडगाव |

**२. दरपत्रक सादर करण्याच्या अटी व शर्ती :-**

अ) वर नमुद केलेल्या मालाच्या संपुर्ण पुरवठयाचे कंत्राट असेल.
आ) पुरवठादाराने भरण्याचे सर्व शुल्क कर, आकार, यांचा नमुद केलेल्या किंमतीत समावेश असावा.
इ) कंत्राट संपेपर्यंत बोलीतल्या सर्व किंमती अपरिवर्तनीय असतील. त्यात कोणतीही तडजोड होणार नाही.
ई) सोबत जोडलेले निविधा सुरक्षा घोषणा प्रपत्र भरून देणे बंधनकारक आहे.
उ) काळ्या यादीत समावेश नसलेबाबत प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे.

३. दरपत्रक मागणी पत्रातील पात्रतेनुसार आपल्या संस्थेचे दर, जर न्युनत्तम आले आणि आपल्याला पुरवठा / कार्यारंभ आदेश देऊनही आपण पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविल्यास आपले नाव काळ्या यादीत टाकण्यात येईल. तसेच अशी कामे करून घेणाऱ्या इतर यंत्रणांना आपले नाव काळ्या यादीत टाकलेबाबत कळविण्यात येईल.

४. कोणताही पुरवठादार फक्त एकच दर पत्रक सादर करेल.

५. नमुद केलेल्या दरामध्ये वाहतुक खर्च, हमाली खर्च, उभारणी खर्च, या सर्व बाबींचा समावेश असावा.

६. **दरपत्रक वैधता** :- दरपत्रक सादर करण्याच्या अंतिम मुदतीनंतर किमान १५/३०/४५/६०दिवस वैध राहील. (आवश्यक नसेल तेथे खोडा)

Scanned with CamScanner

७. **दरपत्रकांचे मुल्यांकन**: - सहया केलेल्या सर्व अटींची पुर्तता करणाऱ्या दरपत्रकांचे एकत्रित मुल्यांकन केले जाईल.

८. **पुरवठा आदेश देणे** :- सर्वात कमी किंमतीचे आणि योग्य रित्या पुर्ण केलेले दरपत्रक सादर करणाऱ्यास पुरवठा आदेश देण्यात येतील.

९. वस्तु व यंत्राचा पुरवठा करून उभारणी करून त्याची यशस्वी चाचणी पुर्ण केल्यानंतर पुढील ३०दिवसात देयकाचे भुगतान केले जाईल.

१०. पुरवठा केलेल्या वस्तुंना गॅरंटी / वॉरंटीचे प्रचलित नियम लागू राहतील.

११. दरपत्रका सोबत सादर करावयाची दस्तऐवज

अ) दरपत्रक (सोबत जोडलेल्या नमुन्यात)

आ) दुकानाचा परवाना

इ) पॅनकार्डची प्रत

ई) मागील वर्षाचे प्रमाणित ताळेबंद (Audited Balance Sheet) किवा ITR ची प्रत

उ) समान साहित्य पुरवठा केल्याचे पुरवठा आदेश व बिलाची/ टॅक्स ईनव्हाइस प्रत

१२. कोणत्याही परिस्थितीत दरपत्रक मागणी आदेश रद्द करण्याचा किंवा बदल करण्याचा अधिकार या कार्यालयाकडे राखून ठेवण्यात येत आहे.

१३. दरपत्रक सादर करण्याची अंतिम मुदत १०/१०/२०२३ दुपारी २ वाजेपर्यंत

१४. दरपत्रक सीलबंद लिफाप्यात सादर करण्याचे ठिकाण स्नेहबंध अग्रो फार्मर्स प्रोड्युसर कं लि.चापडगाव

१५. विहित मुदतीत प्राप्त झालेले सर्व दरपत्रक लिफाफे दिनांक १०/१०/ २०२३ दुपारी ४ वाजता उपस्थित पुरवठादार यांच्या समोर उघडण्यात येतील .

स्वाक्षरी

(अध्यक्ष संपादन समिती)

Snehbandh Agro Farmers Producer Co. Ltd.
U01114
PN2020
PTC194889

Scanned with CamScanner